# विद्यापीठ प्रशासनाची महिन्यातून आढावा बैठक घ्या

## तंत्रशिक्षण मंत्र्यांचे विभागीय उच्चशिक्षण सहसंचालकांना बैठकीत आदेश

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त राज्य शासनाने मंजूर केलेल्या ४०.३३ कोटी निधीपैकी उर्वरित ३५.५८ कोटी निधी मिळावा. निवड समितीमधील शासनाच्या प्रतिनिधींचे दरमहा वेतन विद्यापीठाच्या मागणीनुसार देण्यात यावे. विद्यापीठातील वर्ग एक आणि वर्ग दोनच्या अधिकाऱ्यांची वेतननिश्चिती करावी. यासह अन्य विषयांवर विद्यापीठाची आढावा बैठक झाली. या बैठकीत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी विद्यापीटाच्या प्रश्नासंदर्भात कोल्हापूर विभागीय उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. अशोक उबाळे यांना दिल्या.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आढावा बैठकीत माहिती घेताना तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत. सोबत प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, खा. मंडलिक, आ. आबिटकर आदी.**

विद्यापीठात झालेल्या आढावा बैठकीत विद्यापीठातील कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती सुधारित आकृतीबंधानुसार करावी. शिक्षक पदांच्या आकृतीबंधातील पदनामातील बदलाबाबतचा फेरप्रस्ताव शिक्षण संचालकांकडे पाठवण्यात आला आहे. मात्र अद्याप कार्यवाही झालेली नाही. विद्यापीठातील क्रिडा विभागातील क्रिडा प्रशिक्षकांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करावी. विद्यापीठातील पदांच्या आकृतीबंधानुसार उपअभियंता (विद्युत), सांख्यिकी अधिकारी, वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक (रसायनशास्त्र), वरिष्ठ लघुलेखक, लघुलेखक, फोरमन, सुतार, माळी व हेडमाळी या पदांच्या सहाव्या वेतन आयोगामध्ये पदनाम, वेतनबँड, व ग्रेड वेतन बदलाबाबतच्या त्रूटींचे निवारण करून योग्य शासन आदेश काढावा. विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागास शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय म्हणून मान्यता देण्यात यावी. यासह जवळपास २५ विषयांवर आढावा बैठक झाली. या बैठकी दरम्यान मंत्री सामंत यांनी महिन्यातून एकदा आढावा बैठक घेवून, शिक्षणमंत्रालयास विद्यापीठातील प्रश्नासंदर्भात माहिती द्यावी, अशा सूचना विभागीय सहसंचालक डॉ. उबाळे यांना दिल्या.

# श्रेणी सुधारण्यासाठी डिसेंबरनंतर घेणार परीक्षा

## उदय सामंत यांची माहिती : महाराष्ट्रात अंतिम सत्राच्या परीक्षा सध्या घेणे अशक्य

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दोन वेळा दिलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्रात अंतिम सत्राच्या परीक्षा सध्या घेणे शक्य नाही. त्यामुळे सरासरी पद्धतीनेप्रमाणे गुण देऊन या विद्यार्थ्यांना पदवी द्यावयाची. ज्या विद्यार्थ्यांना गुण, श्रेणी सुधारण्यासाठी परीक्षा द्यावयाची आहे, त्यांची परीक्षा कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर डिसेंबरनंतर घेतली जाईल. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारला परीक्षाच घ्यावयाच्या नाहीत, असा विरोधक करीत असलेला आरोप चुकीचा असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी रविवारी येथे पत्रकार परिषदेत सांगितले.

### राऊत यांच्या चिरंजीवाचा व्हिडीओ एडिट केलेला

खासदार विनायक राऊत यांच्या चिरंजीवाबाबत व्हिडिओ ट्विट करणाऱ्यांबद्दल काय बोलायचे? विरोधकांनी ट्विट केलेला हा व्हिडीओ एडिट केलेला आहे. राऊत यांचा चिरंजीव निर्व्यसनी आहे. त्यामुळे विरोधकांच्या आरोपात तथ्य नसल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले.

- ६० जीआर काढून ते मागे घेतले नाहीत. ट्विट करुन ते डिलिट केलेले नाही.
- एक जीआर काढून त्यावर ठाम आहे, असे मंत्री सामंत यांनी माजी शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या टीकेला उत्तर दिले.

कोल्हापूर दौऱ्यावर आलेल्या मंत्री सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. देशभरात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत आहे. दिल्ली, पंजाब, राजस्थान, आदी राज्यांसह आयआयटीसारख्या संस्थेने परीक्षा रद्द केली आहे. त्यामुळे यूजीसीने सद्य:स्थिती समजून घ्यावी. राज्यातील सर्व कुलगुरुंशी चर्चा करून, त्यांच्या शिफारशी घेऊन राज्य सरकारने अंतिम सत्राच्या परीक्षांबाबत निर्णय घेतला आहे. अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांना आता पदवी देऊन कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर गुण, श्रेणी सुधारण्यासाठी परीक्षा घेण्याचा निर्णय यूजीसीने देशभरासाठी घ्यावा. त्याबाबचे पत्र दोन दिवसांत यूजीसीला पाठविणार आहे. त्यामु सध्या परीक्षेच्या मुद्द्यावरून राजकार करण्यापेक्षा विरोधकां विद्यार्थिहिताचा विचार करावा, अ मंत्री सामंत यांनी सांगितले. मंत्री साम म्हणालेया वर्षीचे शुल्क परत मिळे अथवा पुढील वर्षासाठी ते आकारा अशा पर्यायांचा विचार सरकार करी आहे. त्यामुळे पालकांनी निर्धा राहावे.एटीकेटी विद्यार्थ्यांना सरास गुण देऊन कॅरी फॉरवर्ड केले जाईल. कॅरी फॉरवर्ड होणार नाहीत त्यांना ग्रे गुण दिले जातील. तरीही जे उत्ती होणार नाहीत, त्यांची कोरोनाच प्रादुर्भाव कमी झाल्यावर परीक्ष घेतली जाईल. ग्रंथालय सु करण्याबाबत लवकरच निर्णय घेतल जाईल. आगामी अधिवेशना ग्रंथालयाबाबत नवे धोरण आणत जाणार आहे.

# सीमाभागात लवकरच शासकीय महाविद्यालय

» पान १ वरून

श्री. सामंत म्हणाले, 'चंदगड तालुक्यातील शिनोळी येथे दोन जागा आहेत. यात एका खासगी कंपनीची पायाभूत सुविधा असणारी इमारत भाडेतत्त्वावर घेण्याचा विचार आहे. याशिवाय तुडये, म्हाळुंगे गावातही जागांची पाहणी केली आहे. जागेची निश्चिती लवकरच करून नव्या शैक्षणिक वर्षात अध्यापन सुरू होईल. पहिल्या वर्षी प्रमाणपत्र असणारे कमी कालावधीचे कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम मराठी माध्यमातून सुरू केले जातील. दुसऱ्या वर्षी पदविका आणि पदवी अभ्यासक्रमही सुरू होतील. यात पारंपरिक विद्याशाखांबरोबरच व्यावसायिक अभ्यासक्रमही शिकवले जातील. शिवाजी विद्यापीठ या महाविद्यालयाचे संचालन करेल.'

आज शिवाजी विद्यापीठात शासकीय महाविद्यालयाबाबत बैठक झाली. यात खासदार संजय मंडलिक, आमदार प्रकाश आबिटकर, राजेश पाटील, ऋतुराज पाटील उपस्थित होते. यानंतर विद्यापीठाची आढावा बैठक सामंत यांनी घेतली. या बैठकीत अनेक प्रश्नांवर चर्चा झाली. यात प्रामुख्याने सुवर्णमहोत्सवी निधी, विद्यापीठातील वर्ग १ व २ च्या अधिकाऱ्यांची वेतननिश्चिती, पदनामातील बदलाबदल, क्रीडा अधिविभागातील प्रशिकांच्या सहाव्या वेतन आयोगानुसार होणारी वेतननिश्चिती, तंत्रज्ञान विभागाला अभियांत्रिकी महाविद्यालय म्हणून मान्यता या सर्व विषयांवर चर्चा झाली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी मंत्री सामंत यांच्याशी चर्चा केली.

# अंतिम वर्ष परीक्षा न घेण्यावर सरकार ठाम

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत; 'यूजीसी'ला दोन दिवसांत पत्र : एटीकेटीबाबतही निर्णय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अंतिम वर्षतील शेवटच्या सत्राच्या परीक्षा न घेण्यासंदर्भात आपत्ती व्यवस्थापनाने घेतलेल्या निर्णयाचे पत्र येत्या दोन दिवसांत विद्यापीठ अनुदान आयोगाला पाठविण्यात येणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्यावरून अंतिम वर्ष शेवटच्या सत्राच्या परीक्षा घेणार नसल्याच्या भूमिकेवर सरकार ठाम असल्याचे स्पष्ट झाले आहे. एटीकेटीच्या विद्यार्थ्यांसंदर्भात कुलगुरूंच्या समितीच्या अहवालातील शिफारशींवर दोन दिवसांत निर्णय होईल आणि त्यांचाही प्रश्न सुटेल, असेही सामंत म्हणाले.

केंद्र सरकार व 'यूजीसी'ने अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत काय निर्णय घ्यावा, हा त्यांचा प्रश्न आहे. महाविकास आघाडी सरकारने अंतिम वर्षाच्या परीक्षा कायमस्वरूपी रद्द करण्याचा निर्णय घेतलेला नाही. कोरोनानंतर गुण व ग्रेडमध्ये सुधारणा करायची त्या विद्यार्थ्यांची सरकार परीक्षा घेणार आहे. या निर्णयापूर्वी कुलगुरूंसमवेत चर्चा करून व त्यांना विश्वासात घेऊनच निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्य सरकार काम करीत आहे. १३ कुलगुरूंनी परीक्षा घेऊ शकत नाही, अशी शिफारस राज्य सरकारला केली आहे. याबाबत अहवाल दोन दिवसांत स्वीकारणार असल्याचे सामंत म्हणाले.

### विद्यार्थ्यांचे खच्चीकरण करू नका

राज्य सरकारने अंतिम वर्ष परीक्षा घेण्याचा निर्णय रद्द केलेला नाही. कोरोनाचे पदवीधारक म्हणून बाहेर पडतील, असे म्हणून विद्यार्थ्यांचे खच्चीकरण करू नका, अशी टीका उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी विरोधी पक्षावर केली.

### प्राध्यापक भरतीस स्थगिती नाही

राज्यातील प्राध्यापक भरतीस स्थगिती दिलेली नाही. वित्त विभागाच्या आदेशाने स्थगिती आली आहे. छोट्या प्रवर्गाचा प्रश्न निकाली काढला आहे. कोरोनामुळे प्रक्रिया थांबली होती. प्राचार्य भरतीबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास पाठविला असून, सकारात्मक प्रतिसाद असल्याचे मंत्री सामंत म्हणाले.

राज्य सरकारच्या आपत्ती व्यवस्थापनाने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेता येणार नाहीत, असा दोनवेळा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारला अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा घ्यायच्या नाहीत, असा 'यूजीसी' व केंद्र सरकारचा कोणी गैरसमज करून देत असेल, तर हे धादांत खोटे आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठ, आयआयटीसह पंजाब, राजस्थान, हरियाणा, दिल्ली राज्यांनी परीक्षा रद्द केल्या आहेत. 'यूजीसी'ने समजून घेऊन विद्यापीठांकडून परिस्थितीचा आढावा घ्यावा. परीक्षांबाबतच्या निर्णयास राजकीय रंग देऊ नये, विद्यार्थी हिताचा निर्णय घ्यावा, असे ते म्हणाले.

पदवीच्या प्रथम व द्वितीय वर्षाबाबत अनिश्चितता आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याअगोदरच याचे निकाल तयार झाले आहेत. एटीकेटीबाबत कुलगुरूंनी केलेल्या शिफारशींसंदर्भात दोन दिवसांत निर्णय घेतला जाईल. त्यानुसार २४ लाख विद्यार्थ्यांचा प्रश्न सुटणार आहे. ७ लाख ४० अव्यावसायिक अभ्यासक्रम व २ लाख ४० हजार व्यावसायिक अभ्यासक्रम असे मिळून आठ लाख विद्यार्थ्यांबाबतचा निर्णय राज्य आपत्ती व्यवस्थापनाच्या सूचनेनुसार घेण्याची कार्यवाही विद्यापीठांनी करावी, असे मंत्री सामंत यांनी सांगितले.

ग्रंथालय अनुदान, कर्मचाऱ्यांची पगारवाढ याबाबतचा निर्णय घेण्यासाठी आठ दिवसांत बैठक घेतली जाईल, असेही सामंत म्हणाले.

शिवाजी विद्यापीठासह राज्यातील अनेक विद्यापीठांतील वसतिगृह क्वारंटाईन सेंटर आहेत. हजारो नागरिकांची व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली आहे. त्यामुळे कोरोनाची परिस्थिती अचानक बदलणार नाही. 'यूजीसी'च्या म्हणण्यानुसार, सप्टेंबरमध्ये परीक्षा घ्यायची आहे, मग कोरोना विमानातून जाणार आहे का? परीक्षेसाठी रेड झोन व कंटेन्मेंट झोनमधील विद्यार्थी कसे येऊन परीक्षा देणार, याचे मार्गदर्शन 'यूजीसी'ने करावे, असे मंत्री सामंत म्हणाले.

# शिक्षणमंत्र्यांवर निवेदनांचा वर्षाव

## निवेदनाचा सकारात्मक विचार करण्याचे शिक्षणमंत्र्यांनी संघटनांना दिले आश्वासन

प्रतिनिधी
कोल्हापूर

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी पहिल्यांदाच शिवाजी विद्यापीठाची आढावा बैठक घेतली. या बैठकी दरम्यान विविध विद्यार्थी शिक्षक, कर्मचारी संघटनांनी विविध मागण्यांची निवेदने मंत्री सामंत यांना दिली. या निवेदनावर सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन मंत्री सामंत यांनी संघटनांना दिले.

**ऑनलाईन कोर्स सुरु करा:सेना**

तरुणांना स्वयंपूर्ण बनण्यासाठी शासनाने ऑनलाईन कोर्स सुरू करावेत, अशी मागणी युवा सेनेच्या वतीने करण्यात आली. यावेळी खासदार संजय मंडलिक, आमदार प्रकाश आबिटकर, जिल्हाप्रमुख विजय देवणे, युवा सेनेचे मंजीत माने आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : मंत्री सामंत यांना मागण्यांचे निवेदन देताना जिल्हाप्रमुख विजय देवणे, सोबत खासदार मंडलिक, आमदार आबिटकर.**

**सुटाचे विविध मागण्यांचे निवेदन**

शिक्षण सहसंचालक कार्यालयाकडून प्राध्यापकांकडून पैशाची मागणी केली जाते. केएमसीच्या प्राध्यापकांच्या संदर्भात बेकायदेशीर निर्णय घेवून शासकीय अनुदानाचा गैरवापर केला असल्याचा आरोप निवेदनात केला आहे. यावेळी कार्यवाह डॉ. डी. एन. पाटील, डॉ. सुभाष जाधव आदी उपस्थित होते.

**आप्पाचीवाडीला सीमाभागात घ्या**

१९६५ पूर्वी बेळगाव जिल्ह्यातील चिकोडी तालुक्यात आप्पाचीवाडी होती. सध्या स्वतंत्र गाव झाले आहे. येथील विद्यार्थ्यांना शिक्षणासह नोकरीच्या ठिकाणी अडचणी येतात. त्यामुळे आप्पाचीवाडी गावाचा सिमाभागात समावेश करा या मागणीचे निवेदन देताना विश्वनाथ हिंग्लजे, बाळासाहेब गारगोटे, सूर्याजी पोटले आदी उपस्थित होते.

**गडहिंग्लजला उपकेंद्र व्हावे**

**गडहिंग्लज :** गडहिंग्लज, आजरा, चंदगड या तिन तालुक्यांबरोबरच भुदरगड, कागल तालुक्यातील काही गावाचा संपर्क गडहिंग्लजशी आहे. शिक्षणसंस्थाही कार्यरत असून येथे शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. यासाठी शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र गडहिंग्लजला व्हावे अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमूख विजय देवणे यांनी निवेदनातून केली आहे. यावेळी खासदार प्रा. संजय मंडलिक, आमदार प्रकाश आबिटकर यांची उपस्थिती होती.

लोकमत

# शिफारशींवर नाही, गुणवत्तेवर कुलगुरु निवड

## उदय सामंत यांची सुटाच्या शिष्टमंडळाला ग्वाही

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोणाच्याही शिफारशींचा विचार न करता पूर्णपणे गुणवत्तेच्या आधारावर शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुंची निवड केली जाईल, अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी रविवारी दिली.

शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाच्या (सुटा) शिष्टमंडळाने कुलगुरु निवड, प्राध्यापक भरती, माजी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या कारभाराची चौकशी, आदी विविध मागण्यांचे निवेदन मंत्री सामंत यांना देऊन त्यांच्याशी चर्चा केली. प्राध्यापकांच्या भरतीवर बंदी नाही. कोविडची परिस्थिती निवळल्यानंतर भरतीबाबत निर्णय घेतला जाईल. प्राचार्यांच्या रिक्त जागा भरण्यास अर्थविभागाने मान्यता दिली आहे.

माजी कुलगुरु डॉ. शिंदे यांच्याबाबतच्या तक्रारींची माहिती घेतली जाईल, अशी ग्वाही मंत्री सामंत यांनी दिली. या शिष्टमंडळात सुटाचे अध्यक्ष आर. एच. पाटील, जनरल सेक्रेटरी डी. एन. पाटील, सुभाष जाधव, अरुण पाटील, आर. जी. कोरबू यांचा समावेश होता. दरम्यान, विद्यापीठातील विविध चौकशी समित्यांचे अहवाल दोन-तीन वर्षे झाले तरी सादर झाले नसल्याची माहिती मिळाली आहे. येत्या सात दिवसांत या चौकशी समित्यांच्या कामाचा आढावा घेणार असल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले.

### विद्यापीठांच्या प्रलंबित प्रश्नांचा आढावा

विद्यापीठाचा सुवर्णमहोत्सवी निधी, मासिक वेतन, वर्ग एक व दोनचे अधिकारी यांची वेतननिश्चिती, डीसीपीएस सानुग्रह अनुदान, आदी विविध २९ प्रश्नांचा आढावा मंत्री सामंत यांनी घेतला.

### निवेदने देण्यासाठी गराडा

विविध मागण्यांची निवेदने देण्यासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध संघटनांचे पदाधिकारी, सदस्यांनी मंत्री सामंत यांच्याभोवती गराडा घातला. निवेदन देणाऱ्यांना सोशल डिस्टन्सिंगचा विसर पडला होता.

# फॅब्रिक स्प्रेचे संशोधन कौतुकास्पद : उदय सामंत



कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठाने संशोधित केलेले 'व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे' हे कोरोना विषाणूची साखळी तोडण्यासाठी अत्यंत उपयुक्त असे उत्पादन आहे. या संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठातील संशोधक अभिनंदनास पात्र आहेत, असे गौरवोद्गार राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी आज येथे काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी स्कूलचे सेंटर फॉर नॅनो फॅब्रिक्स येथील संशोधक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी संशोधित केलेल्या या उत्पादनाचा नमुना आज मंत्री सामंत यांना सकाळी सादर करण्यात आला. ते म्हणाले, 'कोरोनाच्या काळात संपूर्ण जगभरात त्याला प्रतिबंध करण्यासाठीचे संशोधन सुरू झाले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनीही या काळात परिश्रम घेऊन एक महत्त्वपूर्ण उत्पादन जगातील आघाडीच्या प्रयोगशाळेतून तपासून सिद्ध केले, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाने गेल्या तीन महिन्यांत लॉकडाउनच्या कालखंडात सामाजिक जबाबदारी व बांधिलकीच्या भावनेतून विद्यार्थी वसतिगृहाच्या तीन इमारती तसेच तंत्रज्ञान अधिविभागाच्या तीन इमारती अशा सहा इमारती जिल्हा प्रशासनाकडे वर्ग केल्या. या ठिकाणी सुमारे दोन हजार व्यक्तींच्या क्वारंटाईन व उपचारांची व्यवस्था होऊ शकली. ही बाबही अत्यंत अभिमानास्पद आहे.'

# लवकरच सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक केंद्र

**उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांची माहिती : चंदगडमधील शिनोळीत शिक्षण केंद्राला प्रारंभ : पारंपरिकसह कौशल्य आधारीत शिक्षणावर भर**

प्रतिनिधी
कोल्हापूर

चंदगड तालुक्यातील शिनोळी येथे सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी कौशल्यावर आधारित मराठी भाषेतील शैक्षणिक केंद्र नव्या शैक्षणिक वर्षांत सुरू होत आहे. याद्वारे सीमाभागातील विद्यार्थ्यांना मराठीतून शिक्षण मिळावे, ही शिवसेनेची मागणी त्यांच्या सरकारने पूर्ण केली आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी रविवारी येथे दिली. शिवाजी विद्यापीठात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी आमदार प्रकाश आबिटकर, कुलसचिव विलास नांदवडेकर उपस्थित होते.



मंत्री सामंत म्हणाले, सीमाभागातील मराठी भाषिक विद्यार्थ्यांसाठी मराठी माध्यमातून शैक्षणिक केंद्रासाठी चंदगड तालुक्यातील शिनोळी, म्हालुंगे, तुडये येथील जागा निश्चित केल्या होत्या. शिनोळी येथील इमारत भाडे तत्वावर घेऊन येथे प्राथमिक स्वरूपात कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. जिल्हाधिकारी दौलत देसाई, पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, डॉ. दीपक पवार, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, खासदार प्रा. संजय मंडलिक, आमदार राजेश पाटील हे यात सदस्य आहेत. त्यांच्यासोबत झालेल्या बैठकांतून या शैक्षणिक संकुलाला मूर्त रूप दिले आहे. येथे विद्यापीठांतर्गत पारंपरिक शिक्षणाबरोबर कौशल्यावर आधारीत शिक्षणाचा निर्णय घेतला आहे. लवकरच अभ्यासक्रमासंदर्भात निर्णय घेण्यात आला आहे.

**प्रवेश शुल्कात वाढ होणार नाही**

नवीन शैक्षणिक वर्षातही प्रवेश शुल्कात वाढ होणार नाही. रद्द परीक्षा शुल्काचा भुर्दंड पालकांना बसू नये, यासाठी पुढच्या प्रवेश शुल्कात जमा करण्याचे विचारधीन आहे. त्यामुळे राज्यातील २४ लाख विद्यार्थ्यांना न्याय मिळणार आहे.

**नवीन शैक्षणिक वर्षासंदर्भात अनिश्चितता**

नव्या शैक्षणिक वर्षासंदर्भात अनिश्चितता आहे. त्यामुळे ऑनलाईन शिक्षण देणाऱ्यांनी शैक्षणिकव्यतिरिक्त शुल्क आकारू नये, असे आवाहन त्यांनी केले. एटीकेटी विद्यार्थ्यांही परीक्षा घेतल्या जाणार नाहीत. याबाबत सरासरी गुण देऊन विद्यार्थ्यांना उत्तीर्ण केले जाणार आहे.

**त्यांच्यासारखे साठ अध्यादेश काढून मागे घेतले नाहीत**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा न घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. यावर विरोधकांनी राजकारण करीत आमच्यावर टीका करण्यास सुरुवात केली आहे. तसेच गुणपत्रकावर कोविड असा शिक्का येणार असल्याची अफवादेखील पसरवली जात आहे. माजी शिक्षणमंत्री वारंवार ट्विटरवरून टीका करीत आहेत. पण आम्ही एकच अध्यादेश काढून त्यावर ठाम आहोत. त्यांच्यासारखे ६० अध्यादेश काढून मागे घेतलेले नाहीत, अशी टीका करीत उच्च व तंत्रशिक्षणमंत्री सामंत यांनी माजी शिक्षणमंत्र्यांवर निशाणा साधला.

**तर अडीच लाख प्राध्यापक, कर्मचारी बाहेर पडणार**

पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा घेण्यासाठी पेपर सेटींग, उत्तरपत्रिका छपाई, वितरण, परीक्षा घेणे या कामासाठी अडीच लाख प्राध्यापक व कर्मचारी बाहेर पडणार. तर राज्यातील साडेचोवीस लाख विद्यार्थी परीक्षा देणार. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या संख्येने प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचारी एकत्रित आल्यास कोरोनाचा धोका वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे परीक्षा न घेण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे

**ग्रंथालयावरील निर्बंध उठवण्यासंदर्भात पुढील आठवड्यात चर्चा**

आमदार आबिटकर यांनी ग्रंथालयाचे अनुदान, कर्मचारी वेतनासंदर्भातील अहवाल सादर केला आहे. यावर चर्चा करून, ग्रंथालये सुरू करण्यासंदर्भात पुढील आठवड्यात निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**प्राध्यापक भरतीला स्थगिती नाही**

प्राध्यापक भरतीला राज्याच्या शिक्षण विभागाने स्थगिती दिलेली नाही. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर नोकर भरती परवडत नाही, असा आदेश ४ जुलै रोजी वित्त व लेखा विभागाने काढला आहे. लॉकडाऊननंतर प्राचार्य, प्राध्यापक आणि कर्मचारी भरती केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**राज्य शासन पदवी, पदव्युत्तरच्या परीक्षा घेणार नाही**

'युजीसी'ने परीक्षा घेण्याच्या सूचना दिल्या असल्या तरी राज्य शासन पदवी, पदव्युत्तरच्या परीक्षा घेणार नाही. सरासरी गुणांवर विद्यार्थ्यांना उत्तीर्ण केले जाणार आहे. लॉकडाऊननंतर विद्यार्थ्यांना क्लास इम्प्रुव्हमेंटसाठी परीक्षा देता येणार आहे.

# 'व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे' संशोधन अभिमानास्पद...

## तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत : शिवाजी विद्यापीठातील संशोधनाचे कौतुक

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील संशोधकांनी केलेले 'व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे' हे कोरोना विषाणूची साखळी तोडण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. कोरोनावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी विद्यापीठातील संशोधक प्रयत्न करीत आहेत, हीच मोठी कौतुकाची गोष्ट आहे, असे गौरवोद्गार राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी स्कूलचे सेंटर फॉर नॅनो फॅब्रिक्स येथील संशोधक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी संशोधित केलेल्या या उत्पादनाचा नमुना रविवारी मंत्री. सामंत यांना सादर करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. त्यांनी संशोधन करणाऱ्या सर्वांचे विशेष अभिनंदन केले. त्यांचे हे संशोधन गौरवास्पद असल्याचे ते म्हणाले.

मंत्री सामंत म्हणाले, कोरोनाच्या काळात संपूर्ण जगभरात त्याला प्रतिबंध करण्यासाठीचे संशोधन सुरू झाले आहे. विद्यापीठाच्या संशोधकांनी सुद्धा या काळात परिश्रम घेऊन एक महत्त्वपूर्ण उत्पादन जगातील आघाडीच्या प्रयोगशाळेतून तपासून सिद्ध केले आहे, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाने गेल्या तीन महिन्यांत लॉकडाऊनच्या कालखंडात सामाजिक जबाबदारी व बांधिलकीच्या भावनेतून विद्यार्थी वसतिगृहाच्या तीन इमारती तसेच तंत्रज्ञान अधिविभागाच्या तीन इमारती अशा सहा इमारती जिल्हा प्रशासनाला कोव्हिड केंद्रासाठी दिल्या आहेत. या ठिकाणी सुमारे दोन हजार व्यक्तींच्या क्वॉरंटाईन व उपचारांची व्यवस्था केली आहे, ही बाब देखील अत्यंत अभिमानास्पद असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.



कोल्हापूर : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांना 'व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे'चा नमुना सादर करताना संशोधक डॉ. किरणकुमार शर्मा, सोबत आ. राजेश पाटील, प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, खासदार प्रा. संजय मंडलिक, आ. प्रकाश आबिटकर, आ. ऋतुराज पाटील, अजय म्हेतर आदी.

# विद्यापीठात चार प्रभारी अधिष्ठातांची निवड

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठात चार विद्याशाखांसाठी प्रभारी अधिष्ठातांची निवड करण्यात आली. यामध्ये दोन विभागप्रमुखांसह दोन प्राचार्यांचा समावेश आहे. प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी या निवडी केल्या आहेत.

माजी कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांचा कार्यकाळ संपल्यानंतर विद्यापीठातील चार अधिष्ठातांचा कार्यकाळही संपला. त्यामुळे अधिष्ठातांची पदे रिक्त होती. प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी प्रभारी अधिष्ठातांची निवड केली. यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. व्ही. जे. फुलारी यांना करण्यात आले आहे. वाणिज्य व व्यवर शास्त्र विद्याशाखेचे प्रभारी म्हणू डॉ. ए. एम. गुरव यांची निवड राधानगरी महाविद्यालयाचे ; डॉ. डी. एस. मोरसका यांची निवड मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणून करण्यात आली आहे. आंतरविद्याशाखेच्या अधिष्ठाता म्हणून विटा येथील प्राचार्या डॉ. मेघा गुळवणी यांना निवडण्यात आले. प्रभारी कुलगुरूंच्या कार्यकालापुरतीच निवड असून नवे कुलगुरू नवे अधिष्ठाता नेमतील.



# विद्यापीठाचे शैक्षणिक संकुल यावर्षीपासून सीमा भागात सुरू

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांची माहिती



**कोल्हापूर : महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक उपक्रम राबविण्यासंदर्भात शिवाजी विद्यापीठात आयोजित बैठकीत बोलताना उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत. शेजारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, खा. संजय मंडलिक, आ. प्रकाश आबिटकर, आ. राजेश पाटील, जिल्हा पोलिसप्रमुख डॉ. अभिनव देशमुख, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मराठी भाषिक आणि विद्यार्थ्यांना ताकद देण्यासाठी सीमा भागात दहा एकर परिसरात शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक संकुल दोन टप्प्यांत उभे करण्यात येणार आहे. यावर्षीपासून विद्यापीठाशी संलग्न पारंपरिक तसेच कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम सुरू केले जातील, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक उपक्रम राबविण्यासंदर्भात शिवाजी विद्यापीठात रविवारी बैठक झाली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, खा. संजय मंडलिक, आ. राजेश पाटील, आ. प्रकाश आबिटकर, आ. ऋतुराज पाटील, जिल्हा पोलिसप्रमुख डॉ. अभिनव देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी भाऊसाहेब गलांडे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. अशोक उबाळे उपस्थित होते. बैठकीनंतर ते माध्यमांशी बोलत होते.

मंत्री सामंत म्हणाले, सीमा भागात शैक्षणिक संकुल सुरू करण्याबाबत मार्च महिन्यात बैठक झाली. यात शैक्षणिक संकुल उभे करण्याचा निर्णय झाला. १ जुलै रोजी याबाबत आदेश काढला असून कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे.

चंदगड-बेळगाव रस्त्यावर शिनोली, तुडये, म्हाळुंगे परिसरात जागा पाहण्यात आली आहे. तसेच शैक्षणिक संकुलासाठी एका खासगी कंपनीने भाडेतत्त्वावर जागा देण्यास तयारी दर्शविली आहे. कौशल्य अभ्यासक्रमाच्या माध्यमातून तरुणांना प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून दिला जाणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांना दहा एकर जागा शोधण्यास सांगितली आहे. त्यासाठी परिसरातील लोकांची जनजागृती केली जाणार आहे. दुसरी जागा ही सात हेक्टर असून त्यापैकी दहा एकर जागा उच्च शिक्षण विभागास द्यावी, अशी सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केली आहे.

आढावा बैठकीत विद्यापीठाच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात मंत्री सामंत यांना माहिती देण्यात आली. शिवाजी विद्यापीठ सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त मंजूर प्रकल्पासाठीचा निधी, दरमहाचे मासिक वेतन, शिक्षकेतर पदांच्या आकृतीबंधानुसार प्राप्त झालेल्या निर्णयातील वेतनश्रेणी त्रुटी, डीसीपीएस सानुग्रह अनुदान, ई-सेवार्थ, जी. पी. एफ. परतावा, उड्डाण पूल बांधकाम निधी यांचा समावेश आहे. हे प्रश्न मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली.

### शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांचे कौतुक

शिवाजी विद्यापीठाने संशोधित केलेल्या 'व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे' हे कोरोना विषाणूचा साखळी तोडण्यासाठी उपयुक्त असे उत्पादन आहे. संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठातील संशोधक कौतुकास पात्र आहेत. संशोधकांनी परिश्रम घेऊन एक महत्त्वपूर्ण उत्पादन जगातील आघाडीच्या प्रयोगशाळेतून तपासून सिद्ध केले आहे, ही महत्त्वपूर्ण बाब आहे, असे गौरवोद्‌गार मंत्री सामंत यांनी काढले.

### १५ दिवसांत सीमा भागातील कार्यकर्ते, संघटनांना भेटणार

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सीमा भागात शैक्षणिक संकुल सुरू करण्याची जबाबदारी सोपविली होती. त्याअनुषंगाने येणाऱ्या १५ दिवसांत सीमा भागात जाऊन तेथे काम करणारे पदाधिकारी, कार्यकर्ते, संघटना यांच्याशी चर्चा करण्यात येईल. त्यांना आवश्यक असणारे अभ्यासक्रम सुरू केले जातील, असे मंत्री सामंत म्हणाले.

# मंत्री सामंत यांच्याकडे मांडली गाऱ्हाणी

## विविध संघटनांतर्फे दिली निवेदने; सातवा वेतनसह सीमाभागाबाबत प्रश्न

**कोल्हापूर, ता. १९ :** उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांच्यापुढे मागण्यांचे गाऱ्हाणे आज विविध संघटनांनी मांडले. श्री. सामंत विद्यापीठात येण्यापूर्वीच त्यांनी विद्यापीठात हजेरी लावली. विद्यार्थी हित, गैरकारभार, सीमा भागातील समावेश, सातवा वेतन आयोग या प्रकारांतील या मागण्या होत्या.

**गडहिंग्लजमध्ये विद्यापीठ उपकेंद्राची मागणी**

शिवसेनेने सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी गडहिंग्लज येथे शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करावे, अशी मागणी श्री. सामंत यांच्याकडे केली. निवेदनात म्हटले आहे, गडहिंग्लज, आजरा, चंदगड सीमाभागासह गारगोटी, कापशी खोऱ्यातील पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. या भागात अनेक शिक्षण संस्था आहेत. अनेक विचारवंत, शास्त्रज्ञ, संशोधक तसेच मराठीचा गाढा अभ्यास करणारे दिग्गज आहेत. त्याचे या उपकेंद्राला योग्य मार्गदर्शन मिळेल. सीमा भागातील विद्यार्थ्यांना फायदा होईल. शिष्टमंडळात विजय देवणे, संजय पवार यांचा समावेश होता.



**कोल्हापूर : वेतननिश्चिती रोखणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करा, या मागणीचे निवेदन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांना देताना शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे शिष्टमंडळ.**

**'शिक्षण सहसंचालक'मधील भ्रष्ट कारभाराची चौकशी करा**

शिक्षण सहसंचालक कार्यालयातील भ्रष्ट कारभाराची चौकशी करावी, अशी मागणी शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाचे (सुटा) प्रमुख कार्यवाह डॉ. डी. एन. पाटील यांनी केली. प्राध्यापकांच्या सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करताना गैरकारभार व भ्रष्टाचार झाला आहे, अनावश्यक व चुकीच्या त्रुटी काढून भ्रष्टाचार करण्यात आला आहे, प्राध्यापकांना खासगीत बोलावून पैशाची मागणी केली जाते, स्थान निश्चितीत अक्षम्य विलंब केला जात आहे, केएमसी कॉलेजमधील प्राध्यापकांसंदर्भात बेकायदेशीर व गैरनिर्णय घेतले आहेत, शासकीय अनुदानाचा गैरवापर केला आहे, असे आरोप निवेदनात केले आहेत. शिक्षण सहसंचालक कार्यालयातील भ्रष्ट अधिकाऱ्यांची बदली करावी, अशी मागणीही केली आहे.

**आप्पाचीवाडीला सीमा भागात घ्या**

सीमा भागाच्या यादीत आप्पाचीवाडीचा समावेश करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. आप्पाचीवाडी (ता. चिक्कोडी, जि. बेळगाव) १९६५पूर्वी कुर्ली गावात समाविष्ट होते. ते सध्या स्वतंत्र गाव असून, तेथे स्वतंत्र ग्रामपंचायत आहे. महाराष्ट्र राज्याच्या सीमा भाग यादीत हे गाव स्वतंत्र असे नमूद नाही. गावातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व नोकरीं समस्या निर्माण होत आहेत. निवेदनावर विश्वनाथ हिंग्लजे, बाळासाहेब गारगोटे, सूर्याजी पोटले यांची नावे आहेत.

**वेतननिश्चिती रोखणाऱ्यावर कारवाई करा**

वेतन निश्चिती व निवृत्ती वेतन रोखणाऱ्या शिक्षण सहसंचालक कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. पी. माने यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने केली. निवेदनात म्हटले आहे, माजी सैनिक आनंदराव धनवडे विद्यापीठाच्या चौकीदार पदावरून निवृत्त झाले आहेत. देशाचे संरक्षण करणाऱ्या माजी सैनिकाच्या वेतन निश्चितीचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. शंकर खोत यांची वेतन निश्चितीही मंजूर झालेली नाही. शिष्टमंडळात संस्थापक अध्यक्ष वसंतराव मगदूम, अध्यक्ष सुनील देसाई यांचा समावेश होता. विद्यापीठ कर्मचारी सातवा वेतन आयोग कृती समितीने प्रशासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन लागू करावा, अशी मागणी केली. शिष्टमंडळात दीपक पवार, रघुवीर व्हावळ, संजय पसारे, सुभाष मुळे, कैलास मोहिते यांचा सहभाग होता.

# शिक्षक भरती प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी

**कोल्हापूर, ता. १९ :** जयसिंगपूर महाविद्यालयातील शिक्षक भरती प्रक्रियेची सखोल चौकशी करावी, अशी मागणी संयुक्त विद्यार्थी संघटनेने केली.

सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण, औषधी द्रव्ये वगळता कोणत्याही विभागाने नवीन पद भरती करू नये, असा शासन आदेश आहे. असे असताना शिवाजी विद्यापीठाने घाईने जयसिंगपूर महाविद्यालयाच्या शिक्षक भरतीबाबत तक्रारी असतानादेखील मान्यता दिली आहे. ही बाब शासनाच्या नियमांचे उल्लंघन करणारी आहे. विद्यापीठाने भरती प्रक्रियेस कोणत्या प्रकारे मान्यता दिली, याची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, असे संघटनेच्या निवेदनात म्हटले आहे. त्याचबरोबर प्राचार्य डॉ. वसंत हेळवी यांच्यावर भ्रष्ट कारभाराचा आरोप करत त्यांच्यावर कारवाई करावी व कोरोना काळातील विद्यापीठाच्या अंतिम वर्गाच्या परीक्षेसह भाग एक व दोनमधील सर्व एटीकेटी विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करावे, या मागण्याही केल्या आहेत. मंदार पाटील, अभिजित राऊत, ऋतुराज माने, प्रतीक काटकर, महेश राठोड, सिद्धांत गुडाळे यांचा शिष्टमंडळात समावेश होता.



**कोल्हापूर : संयुक्त विद्यार्थी संघटनेतर्फे मंत्री उदय सामंत यांना निवेदन देताना मंदार पाटील, अभिजित राऊत आदी.**

लोकमत

## उदय सामंत यांची माहिती : यावर्षीपासून 'कौशल्य अभ्यासक्रम'

# सीमाभागासाठी शासकीय महाविद्यालय लवकरच

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** चंदगड तालुक्यात सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठ संचलित शासकीय महाविद्यालयाचा प्रारंभ लवकरच करण्यात येईल. त्यापूर्वी तातडीने यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून कौशल्य विकासावर आधारित आणि रोजगार उपलब्ध होतील असे पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रम लवकरच सुरु केले जाणार आहेत, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी रविवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

या महाविद्यालयाबाबतच्या आढावा बैठकीनंतर मंत्री सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी आमदार प्रकाश आबिटकर, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते. शिनोळी एमआयडीसीतील एका कंपनीची पाच एकर जागा आणि पायाभूत सुविधांची पाहणी केली असून, ती पाच वर्षांच्या भाडेतत्त्वावर उपलब्ध झाल्यास त्या ठिकाणी लवकरच शासकीय महाविद्यालयाचा प्रारंभ केला जाईल. शासकीय जागा मिळवून देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना सूचना केली आहे. पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याची कार्यवाही समितीकडून होईल, असे मंत्री सामंत यांनी सांगितले. या महाविद्यालयासाठी समितीने चंदगड तालुक्यातील शिनोळीतील दोन, तुडये, म्हाळुंगे येथील प्रत्येकी एका जागेची पाहणी केली असल्याचे डॉ. नांदवडेकर यांनी सांगितले.

दरम्यान, आढावा बैठकीस खासदार संजय मंडलिक, आमदार राजेश पाटील, प्रकाश आबिटकर, ऋतुराज पाटील, प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी भाऊसाहेब गलांडे, आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात रविवारी सीमाभागातील महाविद्यालयांबाबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. यावेळी खासदार संजय मंडलिक, आमदार प्रकाश आबिटकर, प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख, आमदार राजेश पाटील, आदी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांची परीक्षा फी परत करा : शेट्टी

जयसिंगपूर : कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने महाविद्यालय अंतर्गत असलेल्या यावर्षीच्या परीक्षा रद्द केल्या आहेत. यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांनी भरलेली परीक्षा फी परत द्यावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक, माजी खासदार राजू शेट्टी यांनी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली. फी परत करण्याबाबत शासन सकारात्मक असून, विद्यार्थ्यांना परीक्षा फी परत देण्यामध्ये काही तांत्रिक अडचण आल्यास त्याच फीमध्ये पुढील वर्षीच्या परीक्षा घेतल्या जातील, अशी ग्वाही मंत्री सामंत यांनी दिली आहे.

## सूचना लक्षात घेऊन काम करणार

आढावा बैठकीत खासदार मंडलिक, आमदार राजेश पाटील, प्रकाश आबिटकर आणि ऋतुराज पाटील यांनी मांडलेल्या सूचना लक्षात घेऊन सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठीच्या महाविद्यालयाचे काम केले जाणार असल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले.

## संघटनांच्या मागण्यांबाबत ऑनलाईन बैठका

शिवसेना जिल्हाप्रमुख विजय देवणे आणि संजय पवार, युवा सेना, संयुक्त विद्यार्थी संघटना शिवाजी विद्यापीठ, महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी सातवा वेतन आयोग कृती समिती या संघटनांनी विद्यापीठाचे उपकेंद्र, शिक्षक भरती, ऑनलाईन अभ्यासक्रम, एटीकेटी विद्यार्थी, आदींबाबतच्या मागण्यांची निवेदने मंत्री सामंत यांना दिली. त्यावर येत्या आठवड्याभरात ऑनलाईन बैठका घेऊन सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे मंत्री सामंत यांनी सांगितले.

# राजकारणासाठी विद्यार्थ्यांच्या मनोबलावर आघात नको

## उदय सामंत; अंतिम परीक्षांवरून विरोधकांवर टीका



**उदय सामंत**

कोल्हापूर, ता. १९ : परीक्षेविना पदवी म्हणजे 'कोविड १९' ची पदवी, असा आरोप विरोधक करत आहेत. राजकारण करण्यासाठी निवडणुकांचा हंगाम आहे. सभागृहातही संधी आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना 'कोविड १९ पदवीधर' म्हणून कशाला हिणवता? तुमच्या राजकारणासाठी विद्यार्थ्यांच्या मनोबलावर आघात करू नका, असा टोला उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी आज विरोधकांना लगावला.

श्री. सामंत एका कार्यक्रमानिमित्त येथे आले होते. त्यानंतर शिवाजी विद्यापीठात झालेल्या पत्रकार परिषेदत ते बोलत होते. माजी मंत्री विनोद

पान ९ वर »

### ते निर्णय मागे घेणारे मंत्री!

माजी मंत्री विनोद तावडे यांच्यावर टीका करताना मंत्री सामंत म्हणाले, ''तावडे यांनी सरकारला सूचना जरूर कराव्यात; पण टीका करताना भान राखावे. ते माझ्या कारभारावर टीका करतात. त्यांनी मात्र ६० शासन निर्णय जाहीर केले आणि ते सर्वच मागे घेतले. मी माझ्या शासन निर्णयावर ठाम असतो.''

लोकमत

# ए. एम. गुरव यांच्यासह चारजण प्रभारी अधिष्ठाता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** प्रा. डॉ. ए. एम. गुरव, व्ही. जे. फुलारी, मेघा गुळवणी आणि डी. एस. मोरसका यांची शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी अधिष्ठातापदी निवड झाली आहे. त्यांचा कार्यकाळ हा प्रभारी कुलगुरुंच्या कालावधी इतका असणार आहे. चार अधिष्ठातांचा कार्यकाळ हा माजी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या कार्यकाळाबरोबर संपला. त्यामुळे अधिष्ठातांची पदे रिक्त होती. त्यावर प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी प्रभारी अधिष्ठातांची नियुक्ती केली आहे. त्यात विद्यापीठातील प्रा. डॉ. गुरव यांची वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी, भौतिकशास्त्र विभागातील डॉ. फुलारी यांची विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या, तर विटा येथील बळवंत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मेघा गुळवणी यांची आंतरविद्याशाखेच्या आणि राधानगरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. मोरसका यांची मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या आधिष्ठातापदी नियुक्ती केली आहे.

Kolhapur Main
Page No. 3 Jul 20, 2020
Powered by: erelego.com